महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.९/३९०३२
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दिनांक : २९/१२/२०१०
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# परिपत्रक

विषय : दिनांक ०४ मे २०१० रोजीची अनुपस्थिती "विशेष नैमित्तिक रजा" म्हणून मंजूर करणेबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.विनैसु-१५१०/प्र.क्र.१०६/२०१०/२९ दि.३०.१०.२०१०.

......

दिनांक ०४ मे २०१० रोजी मुंबई शहर व मुंबई उपनगरामध्ये उपनगरीय रेल्वेच्या मोटरमनच्या संपामुळे पश्चिम, मध्य व हार्बर या तीनही लोहमार्गावरील उपनगरीय वाहतूक सेवा बंद तसेच अनियमीत होती. त्यामुळे बहुसंख्य शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत. शासन परिपत्रक क्र.विनैसु-१५१०/प्र.क्र.१०६/२०१०/२९ दि.३०.१०.२०१० नुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक ०४ मे २०१० रोजी विशेष नैमित्तिक रजा मंजूर केली आहे. त्याच धर्तीवर म.रा.वि.वि.कं.म. मधील मुंबई शहर व मुंबई उपनगरातील कर्मचाऱ्यांना दि.०४ मे २०१० रोजी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.९.२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी, दिनांक ०४ मे २०१० रोजी मुंबई मध्ये उपनगरीय रेल्वेच्या मोटरमनच्या संपामुळे पश्चिम, मध्य व हार्बर या तीनही लोहमार्गावरील उपनगरीय वाहतूक सेवा बंद तसेच अनियमीत असल्यामुळे महावितरण कंपनीतील जे अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत त्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या धर्तीवर दिनांक ०४ मे २०१० रोजीची अनुपस्थिती विशेष नैमित्तिक रजा म्हणून मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

३. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सही/- २९/१२/२०१०
*( विजय भि. बागुल )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रति,
१) महावितरण कंपनीच्या निगम कार्यालयातील सर्व विभाग व कक्ष प्रमुख
 - यांना प्रेषण यादीप्रमाणे.

२) मुख्य अभियंता (भांशप), म.रा.वि.वि.कं.मर्या., परिमंडल कार्यालय, भांडुप शहर
 - यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

D:\O&M\Spl.Leave.doc